## बंड्या साने

व्यक्ती/कार्यकर्ता म्हणून आणि 'खोज' संस्थेच्या माध्यमातून मेळघाटातील आदिवासींसाठी पूर्णवेळ कार्यरत.
आदिवासींना सरकारी दवाखान्यात मिळणारी असुविधा/अनास्था, शाळा प्रवेश-शिक्षण, रस्त्यांचा प्रश्न, विजेचा प्रश्न, रेशनिंगचा प्रश्न, रोजगाराचा प्रश्न, वेठबिगारांचा प्रश्न, महिलांवरील अत्याचाराचा प्रश्न; युवक विकास, शेती विकास इत्यादी प्रश्नांवर सातत्याने कार्यरत.
आदिवासींसाठी, मेळघाटासाठी, मेळघाटातील कुपोषणापासून सर्व समस्यांबाबत असलेल्या सरकारी योजनांची बंड्याला इत्यंभूत माहिती. अनेक सरकारी अधिकारी आणि कचेऱ्यांना बंड्या संदर्भ म्हणून ही माहिती आनंदाने पुरवितो. प्रशासन आणि आदिवासी यांना जोडणारा दुवा म्हणून बंड्याचे स्थान महत्त्वपूर्ण आहे.



बंड्या साने

# कायम मैदानात राहायचं, एवढंच केलं

आईवडिलांनी काबाडकष्ट करून जगवलं; भाऊ-बहिणींसोबत राहून शिक्षण केलं. प्रत्येकाने जमेल तेवढं शिक्षण केलं. आई एकही वर्ग शिकली नव्हती, तरी तिने उपाशीपोटी मला कंबरेवर घेऊन शाळेत पोहोचवलं; आणि शाळेत भुकेमुळे आजारी पडलो म्हणून कंबरेवरून शाळेतून घरी आणून खाऊ घातलं. त्या काळी म्हणजे माझ्या जन्मानंतर (१९६६-६८) त्यांनी नागपूरसारख्या शहरात कसं वास्तव्य केलं असेल, याची कल्पना आज करता येत नाही. आईवडिलांनी केलेल्या श्रमांतून आणि भाऊ-बहिणींची साथ असल्यामुळे माझं शिक्षण आणि त्यांना आपलं कर्तव्य, 'मेळघाट'मध्ये निभावता आलं. मेळघाटमध्ये आल्यानंतर पूर्णिमा उपाध्याय, अरुणा आणि मनोज नावाचा कोलकात्याहून पळून आलेला मुलगा, त्याला आम्ही पोलिसांच्या तावडीतून सोडवून आमच्यासोबत ठेवलं होतं. मग दोन वर्षांनंतर त्याची समजूत काढून त्याला परत कोलकात्याला पाठवलं. खरं तर हीच 'खोज'ची सुरुवात. खोज त्या मेळघाटमध्ये रोवून धरणं... खोजला पुढे नेणं... सगळं महत्त्वाचं कार्य पूर्णिमा आणि अरुणानंच केलं. मी तर फक्त त्यांचा सोबती होतो. लोक मला त्यांचा 'सिक्युरिटी गार्ड' म्हणायचे. १९९५ ते आजपर्यंत अविरत कार्य सुरू आहे आणि पुढेही राहणारच आहे. कारण, कर्ज घेऊन एकमजली मजबूत कार्यालय बांधलं आहे, कार्यकर्त्यांना राहायला, वाचायला, सोय करून ठेवली आहे. या दरम्यान उपोषण, आमरण उपोषण, सत्याग्रह, पदयात्रा, यात्रा, निवेदन पत्र, वर्तमानपत्रांतून लिहिणं... सगळं सगळं केलं. लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी 'लोकशाही' पद्धतीने जे जे करता आलं ते ते 'खोज'ने केलंय. एवढंच नाही; तर दोनदा लोकसभा निवडणूक स्वाभिमानासाठी लढवली.

**दु:ख एवढंच वाटतं की, एवढं सगळं करूनही शासन-प्रशासन-मीडिया योग्य दखल का घेत नाही? ज्याप्रमाणे राजकारण्यांच्या बातम्या कायम वर्तमानपत्रांत असतात त्याचप्रमाणे स्वयंसेवी संस्था-संघटनांनी केलेल्या कामांची दखल का घेतली जात नाही? केलेल्या कामांची दखल नाही घेतली तरी चालेल; मात्र लोकांचे प्रश्न काय आहेत, ते तरी आपल्या वर्तमानपत्रांतून मांडायला हवं. आज कुणीही एकटं लढू शकत नाही. आपण स्वत:ला लोकशाहीचे स्तंभ म्हणत असू, तर मिळून कार्य करण्याचा का प्रयत्न करू नये? चुकलं असेल तर तेही लिहायला हवं. कुणी संस्था-संघटना समाजकार्याच्या नावावर भ्रष्टाचार करीत असेल, तर तेही लिहायला हवं.**

स्वत:च्या पैशातून आणि अगदी थोडी मित्रांनी केलेली मदत, त्यातून निवडणूक लढवून आपण कार्यकर्ता आहोत, हे दाखवण्याचा प्रयत्न केला.

मेळघाटसाठी मेळघाटमध्ये, मेळघाटच्या बाहेर आजपर्यंत तब्बल दोन लाख कि.मी. प्रवास केला आहे. बारा ते तेरा हजार पत्रं आजपर्यंत लिहिली आहेत. उद्देश फक्त एवढाच, की येथील बालमृत्यू, कुपोषण कायमचे थांबून येथील मुलांना, समाजाला न्याय मिळावा.

१९९३ पासून नागपूर उच्च न्यायालयात सुरू असलेलं 'कुपोषण-बालमृत्यू' प्रकरण १९९५ पासून नियमित कोर्टात जाऊन ऐकतो आहे. त्यानंतर २००४ पासून मुंबई उच्च न्यायालयात सुरू असलेलं त्याचं प्रकरण ऐकतो आहे. त्याचा सारखा पाठलाग करून लोकांना, मुलांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतो आहे; आणि याच प्रकरणाचा अर्जदार म्हणून प्रत्यक्ष प्रकरणात शिरलो आहे. एवढंच नाही, तर आदिवासींचं वनजमिनींवर अतिक्रमण संदर्भात नागपूर येथे उच्च न्यायालयात रात्री ११.३० वाजता फोन करून दुसऱ्या दिवशी सकाळी ७.३० वाजता स्टे मिळवला. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात सुद्धा जमिनीवरील अतिक्रमणाबद्दल सुरू असलेल्या प्रकरणांत आपले विचार, मत मांडलं. त्या संदर्भात महाराष्ट्रात आलेल्या समितिसमोर मतं मांडून निवेदनं सादर केली. मानव अधिकार आयोग, मुंबई, दिल्ली येथे सुद्धा अर्ज दाखल करून काही प्रमाणात न्याय मिळवून घेतला.

या प्रवासात मेळघाटमध्ये अनेक 'माणसं' सापडली. दिनेश उपासे सारखा परतवाड्याचा युवक आमच्यासोबत आज सुद्धा आहे. जेव्हा लोक, वर्तमानपत्रं आम्हांला धर्मांतर करणारे, नक्षलवादी, कम्युनिस्ट म्हणत होते, त्यावेळेस एकमेव दिनेश उपासे नावाचा युवक-शिक्षक आमच्या सोबत होता. अशी अनेक माणसं आहेत, म्हणूनच हा प्रवास करता आला आणि उद्यासुद्धा करता येईल याची शाश्वती आहे. ह्या चौदा-पंधरा वर्षांत अनेक युवक-युवती शिक्षण घेऊन उद्याच्या 'खोज'ची जबाबदारी स्वीकारायला तयार झाली आहेत.

महत्त्वाचं म्हणजे ह्या सगळ्या कामासाठी पैसा आवश्यक आहेच. त्याशिवाय कुठलंही कार्य शक्य नाही. त्याची सोय मित्रांनी आणि आर्थिक मदत करणाऱ्या संस्थांनी केली आहे. मित्रांमध्ये दिलीप चौबळ 'खोज'च्या निर्मितीपासून आजही सोबत आहेत. ते आमच्या पाठीशीच नाहीत; तर खोजचा एक अविभाज्य घटक आहेत. विजयाताई चौहान यांनी १९९६-९७-९८ दरम्यान आर्थिक मदत केल्याने (युनिसेफच्या माध्यमातून) आम्ही शाळा दुरुस्त केल्या होत्या. त्यानंतर सुद्धा त्यांनी वैयक्तिक स्वरूपात 'खोज'ला मदत केली आणि आजही त्या 'खोज'च्या पाठीशी आहेत. नागपूर, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ, अमरावती येथील - एवढंच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक मित्र सोबतीला आहेत. त्यामुळेच आम्ही हा प्रवास करू शकलो. म्हणजेच लढू शकलो. मी फक्त कायम मैदानात राहायचं, कुठेही जायचं नाही; एवढंच केलं. आर्थिक मदत करणाऱ्या संस्थांनी विश्वास दाखवला नसता, तर आम्हांला कार्य करता आलं नसतं. कारण पैसा जमवायचा की काम करायचं, मोठं कठीण जात असतं. त्यात आय.जी.एस.एस.एस, क्राय, युनिसेफ, टाटा ट्रस्ट, एस.एस.टी., ऑक्सफॅम, जी.जी.जी., अमरावती येथील जि.प. विभाग, आदिवासी विकास विभाग यांच्यामुळे मेळघाटमध्ये लोकांना काही अंशी न्याय मिळवून देता आला.

दु:ख एवढंच वाटतं की, एवढं सगळं करूनही शासन-प्रशासन-मीडिया योग्य दखल का घेत नाही? ज्याप्रमाणे राजकारण्यांच्या बातम्या कायम वर्तमानपत्रांत असतात त्याचप्रमाणे स्वयंसेवी संस्था-संघटनांनी केलेल्या कामांची दखल का घेतली जात नाही? केलेल्या कामांची दखल नाही घेतली तरी चालेल; मात्र लोकांचे प्रश्न काय आहेत, ते तरी आपल्या वर्तमानपत्रांतून मांडायला हवं. आज कुणीही एकटं लढू शकत नाही. आपण स्वत:ला लोकशाहीचे स्तंभ म्हणत असू, तर मिळून कार्य करण्याचा का प्रयत्न करू नये? चुकलं असेल तर तेही लिहायला हवं. कुणी संस्था-संघटना समाजकार्याच्या नावावर भ्रष्टाचार करीत असेल, तर तेही लिहायला हवं.

जर या लोकशाहीच्या स्तंभांनी एकत्र येऊन कार्य केलं, तरच येथील प्रश्न मिटतील आणि वंचित समाजाला, घटकाला न्याय मिळेल अशी आशा आहे.

**बंड्या साने**
'खोज', गौरखेडा (कुंभी), ता. अचलपूर,
जि. अमरावती ४४४८०६.
दूरध्वनी : (०७२२३) २२७२९२.
मोबा. ९८९०३५९१५४.

ओळख

**बबन इंगोले**

# मेळघाटातील 'खोज'चा सफरनामा

बंड्या साने मेळघाटातील आदिवासींच्या पाड्यांवर विकासाचा सूर्य नेण्यासाठी सतत संघर्षशील, धडपड्या, सनदशीर मार्गाने लढणारा - प्रसंगी तेवढाच आक्रमक, समंजस, संयमी, अभ्यासू, आदिवासींच्या जीवन-मरणाच्या समस्यांसाठी स्वयंसेवी संस्था-संघटनेच्या चाकोरीबाहेर लढणारा अत्यंत संवेदनशील लढाऊ कार्यकर्ता. मेळघाटातील आदिवासींच्या विकासासाठी, त्यांना बदलण्यासाठी आयुष्य झोकून देणाऱ्या या समर्पित कार्यकर्त्याच्या संघर्षाचा सफरनामा रोमांचक, अत्यंत काटेरी वाटेने, खाचखळग्यातून झाला आहे. त्याचा हा सफरनामा त्याच्याच शब्दांत कथन करीत आहे.

''मी नागपूरच्या दलित वस्तीत भीषण दारिद्र्य, निरक्षरता, अस्पृश्यतेचे चटके सहन करीत आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. बालवयात 'बालमजुरी' करावी लागली. पुढील शिक्षण वसतीगृहात, प्रसंगी सुट्ट्यांच्या वेळात अनेक प्रकारची कष्टाची कामे करीत बी.एससी. पूर्ण केले. परंतु एम.एससी. करता आले नाही. म्हणून एम.ए. 'लोकप्रशासन' या विषयामध्ये केले.

मध्यंतरीच्या काळात 'दलित रंगभूमी'शी संबंध आला. त्यातून नाटकात सहभाग घेतला. समाजसेवेची आवड असल्यामुळे 'युवा' या सामाजिक संस्थेशी जुळून समाजकार्य करीत असताना 'नर्मदा बचाव आंदोलना'शी संपर्क आला. त्यातून तुरुंगवास घडला. दोनदा तुरुंगात जावे लागले. मेळघाटात १९९१ साली पहिल्यांदा आमचा प्रवेश झाला. मुंबईच्या टाटा इन्स्टिट्यूटमध्ये सी.एस.डब्ल्यू. करीत असताना मेळघाटातील आदिवासींसाठी काम करण्याची तयारी दर्शवली. टाटाचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर काही मित्रमैत्रिणींसोबत मेळघाटात काम सुरू केले. त्यावेळी लोकांना फक्त रोडवरची सेमाडोह, हरिसाल हीच गावे म्हणजे मेळघाट वाटत होते. बराचसा दुर्गम भाग कुणाला माहीत नव्हता.

आतमध्ये व्यवस्थित रस्ते नव्हते, वाहने तर नव्हतीच. कुपोषणाच्या समस्येबरोबर शिक्षण, रोजगार, जमीन, पाणी, आरोग्य यांच्या समस्या मोठ्या प्रमाणावर होत्या. शाळा होत्या, परंतु शाळांना व्यवस्थित छतं नव्हती. मुलांना शिकवण्यासाठी फळासुद्धा नव्हता. कामाची सुरुवात होती. कोणताही आर्थिक आधार नव्हता. परंतु जिवाभावाचे साथी होते. 'खोज' ही संस्था होती. पौर्णिमा उपाध्याय, मनोज, अरुणा यांसारखे साथी एकत्र येऊन 'चुनखडी' गावात आम्ही प्रथम आमचे बस्तान बसवले. आजुबाजूच्या खेड्यांत स्वत:च्या खर्चाच्या भरवशावर काम सुरू केले. जायला साधने नसल्यामुळे रात्री पायी प्रवास केला. घनदाट जंगलातून रात्री-बेरात्री प्रवास, दिवसा लोकसंपर्क यांतून सामाजिक समस्यांचे जळजळीत वास्तव पुढे आले. गोरगरीब आदिवासींवर अवलंबून न राहता आम्ही आमच्या खाण्यापिण्याचे सामान, स्वत:चे कपडे यांचे जवळपास २५ किलोंचे वजन आमच्या बॅगेत घेऊन जात असू. ती बॅग पाठीवर असायची. जिथे मुक्काम, तिथे रात्री चूल पेटायची. सोबत आणलेल्या तांदुळाची खिचडी आणि टोमॅटो-कांदा-मिरचीची चटणी करून जेवण करायचो. असा हा प्रवास सुरू असताना एकदा जीवघेणा बाका प्रसंग आला. पाच-पंचवीस लोकांनी गराडा घातला. ते मारणार, इतक्यात स्थानिक हितचिंतक माझ्या रक्षणार्थ पुढे आला व हल्लेखोरांनी पळ काढला. तसेच एकदा 'खोज'वाले नक्षलवादी आहेत व ख्रिश्चन धर्माचा प्रसार करतात, अशी बातमी एका दैनिकात प्रसिद्ध झाली. बातमी वाचताच आम्ही संबंधित वर्तमानपत्राचे कार्यालय गाठले व या

बातमीचा आधार काय, असे विचारले. त्यांनी 'पोलिसांकडून ही बातमी आली' असे सांगितले. नंतर आम्ही पोलिस आयुक्तांना भेटलो व निवेदने दिली.

असाच प्रयत्न शिवसेनेच्या एका पदाधिकाऱ्याकडून झाला. जि.प. सदस्य असलेल्या पदाधिकाऱ्याने जि.प. (अमरावती)च्या आमसभेत 'खोज' नक्षलवादी विचारांचा प्रचार करते असा निराधार आरोप केला होता. परंतु काही हितचिंतक सदस्यांनी हा प्रयत्न हाणून पाडला. परंतु

**मेळघाटात शाळा फक्त १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला उघडत होत्या. परंतु आम्ही घरोघरी जाऊन शिकवायला शिक्षक आणले. शाळेचे वर्ग वाढविण्यासाठी शासकीय व प्रशासकीय स्तरावर प्रयत्न केले. त्यामुळे वर्गांची संख्या वाढली. मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढले व गळतीचे प्रमाण थोडे कमी झाले. मात्र शिक्षण व गुणवत्ता वाढली नाही. मेळघाटातील शाळांवर छप्परे नव्हती. वर्गात शिकवण्यासाठी फळे नव्हते. तेव्हा युनिसेफच्या मदतीतून आम्ही पडक्या शाळांवर छप्परे टाकली. नवीन फळे बनविले. शाळेची रंगरंगोटी केली. यातून उरलेला आर्थिक निधी युनिसेफला परत केला. परंतु शिक्षणाची 'मूल्यात्मकता' अधिकाऱ्यांच्या 'असहकार' धोरणामुळे वाढली नाही. नाहीतर, एक कृतिशील पिढी मेळघाटात तयार झाली असती आणि 'मेळघाटातील दुर्दैवाचे दशावतार' संपले असते.**

जि.प. चे तथा संपूर्ण जिल्ह्याचे राजकीय वातावरण ढवळून निघाले. आरोप निरर्थक असल्याचे सिद्ध झाले. या सफरनाम्यात सुखदुःखाचे अनेक प्रसंग आले. काही दुःखी करणारे व काम सोडून द्यावे असेही प्रसंग आले आहेत. परंतु काम सोडून जाणे स्वभावात नव्हते.

'खोज'च्या कार्यामुळे आम्ही काम सुरू केले तेव्हा ज्या गावांत सायकली नव्हत्या, तिथे आता मोटार सायकली व अन्य गाड्या दिसतात. साधनहीन असणारा आदिवासी तरुण आता काही प्रमाणात साधन संपन्नतेकडे जात आहे, हा 'खोज'च्या जाणीव जागृतीचा परिणाम आहे. या कार्यात अधिकारी वर्गाचे, कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य मिळाले आहे. हे माझे एकट्याचे यश नाही; तर सर्व संस्थेचे व सहकार्य करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे यश आहे असे मी मानतो.

हे काम करताना शासनाचे अनेक प्रश्नांवर लक्ष वेधण्यासाठी साध्या ग्रामसेवकापासून तर राष्ट्रपतींपर्यंत जवळपास बारा हजार पत्रे व निवेदने लिहिली. आंदोलने केली. कोर्टात 'जनहित याचिका' दाखल केल्या. रोजगार हमी योजना, आदिवासी वन हक्क संरक्षण कायदा निर्माण करण्यासाठी राज्यस्तरावर मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले. पुन्हा जीवघेणा प्रसंग आला. चुनखडी गावात खाली असलेले पडके घर कार्यालय म्हणून मिळाले. त्यात निवास व रात्रीची विद्यार्थ्यांची शाळा सुरू झाली. सुरुवातीला मुले अगदी कच्ची होती. त्यांना शिकवून सक्षम करण्याचा प्रयत्न केला. त्यात यशस्वी झालो. लोकांचा विश्वास संपादन करू शकल्यामुळे गावपंचायतीने आम्हांला कार्यालय बांधून दिले. बहुउद्देशीय कामांसाठी लोकांनी दिलेली ही मदत आमच्या कामाची व आमच्यावरील विश्वासाची पावती म्हटली पाहिजे. चुनखडी गावात आमचे कार्यालय थाटल्यामुळे आजुबाजूचे लोक समस्या घेऊन आमच्याकडे येऊ लागले.

'घाना' या गावात हत्तीद्वारे वनाधिकारी शेती नष्ट करणार अशी वार्ता कानावर आली. त्वरित अमरावतीला जाऊन जिल्हाधिकारी व संबंधितांना भेटलो; परंतु ही बाब त्यांच्या कार्यकक्षेबाहेर असल्याचे कळले. त्यानंतर थेट उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री. जे.एम.पटेल यांच्याशी संपर्क केला; परंतु तुम्ही स्वतः भेटल्यास योग्य होईल, असे त्यांनी कळविले. संबंधित माहितीचा फॅक्स त्यांना पाठवला; परंतु न्यायाधीशांच्या निवासस्थानाचा पत्ता नव्हता. फोन करून पत्ता मिळवला व मित्राला दिला. त्यावेळी 'बाळ ठाकरे यांना अटक होणार' या वार्तेने संपूर्ण

महाराष्ट्र तणावग्रस्त होता. आपण पोहोचू शकतो की नाही, असे वाटत होते. ते दिवस शासकीय सुट्ट्यांचे असल्याने काम होईल की नाही, ही शंकाही मनात होती. कसे तरी वाहन करून रात्री दोन वाजता निघून नागपूरला न्यायाधीश महोदयांचे घरी सकाळी ७ वाजता पोहोचलो. सरकारी वकील ॲड. भूषण गवई यांनी आमची बाजू न्यायालयात मांडली. सकाळी ८ वाजता न्यायाधीश महोदयांनी अमरावती जिल्हाधिकाऱ्यांकडून या बाबीची सत्यता पडताळून पाहून स्थगितीचा आदेश दिला. तो आदेश घेऊन वनाधिकारी यांना सादर केला व एका आदिवासीसह संपूर्ण मेळघाटची जमीन-शेती आम्ही वाचवू शकलो. अशा प्रकारे अन्यायाच्या या प्रकरणाला न्याय मिळाला. मेळघाटचा दुर्गम भाग माहीत नसलेल्या अनेक अधिकाऱ्यांना मेळघाटच्या सत्य परिस्थितीची आम्ही जाणीव करून दिली. त्यामुळे अनेक अधिकाऱ्यांचा आमच्यावरचा विश्वास वाढला. त्यातून आमच्या समन्वयातून घरोघरी रेशनकार्ड, जातीचे दाखले व ७/१२ देण्यात आले. एके दिवशी तर ४०० जातीचे दाखले वाटण्यात आले. त्यावेळी शाळेची परिस्थिती अत्यंत वाईट होती. फक्त १ ते ३ पर्यंत शाळा होती. शिक्षकही येत नव्हते. मेळघाटात शाळा फक्त १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला उघडत होत्या. परंतु आम्ही घरोघरी जाऊन शिकवायला शिक्षक आणले. शाळेचे वर्ग वाढविण्यासाठी शासकीय व प्रशासकीय स्तरावर प्रयत्न केले. त्यामुळे वर्गांची संख्या वाढली. मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढले व गळतीचे प्रमाण थोडे कमी झाले. मात्र शिक्षण व गुणवत्ता वाढली नाही. मेळघाटातील शाळांवर छप्परे नव्हती. वर्गात शिकवण्यासाठी फळे नव्हते. तेव्हा युनिसेफच्या मदतीतून आम्ही पडक्या शाळांवर छप्परे टाकली. नवीन फळे बनविले. शाळेची रंगरंगोटी केली. यातून उरलेला आर्थिक निधी युनिसेफला परत केला. परंतु शिक्षणाची 'मूल्यात्मकता' अधिकाऱ्यांच्या 'असहकार' धोरणामुळे वाढली नाही. नाहीतर, एक कृतिशील पिढी मेळघाटात तयार झाली असती आणि 'मेळघाटातील दुर्दैवाचे दशावतार' संपले असते. परंतु आम्ही आमचे प्रयत्न अत्यंत प्रामाणिकपणे केले, यात काहीही शंका नाही. परंतु हे काम करताना जीवघेणे प्रसंग आयुष्यात आले, त्यांची हकिकत अशी -

एका मित्राने गावातल्या बालिकेचा 'बालमजुरी' करतानाचा फोटो वर्तमानपत्रात छापला. मुलगी शाळेत असल्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी अमरावतीवरून कामगार अधिकारी व शिक्षणाधिकारी यांनी पालकांकडे चौकशी केली. याबाबतीत आम्ही अनभिज्ञ होतो. रात्री मी गाडीत झोपलो असताना एकाएकी लोकांचा जमाव आला व गाडीवर दगडफेक केली. ही बातमी आम्हीच प्रकाशित केली असे त्यांना वाटले. त्यामुळे प्रचंड शिवीगाळ करून गाडीवर दगड फेकून मारून गाडीच्या काचा फोडल्या. या गोंधळामुळे मी झोपेतून उठलो. काय झाले ते कळायच्या आतच एकाने गाडीवर रॉकेल ओतले व गाडीला आगपेटीची काडी लावणार तोच आमच्या 'खोज'च्या कार्यकर्त्याने त्याला अडवले म्हणून मी वाचलो. नंतर आम्ही गाडी काढली व पोलिस स्टेशन गाठले. नंतर संबंधितांनी माफी मागितली व प्रकरण संपले.

सेमाडोह ते चुनखडी गावात जाण्यायेण्यासाठी सुरू असणारी एकमेव 'गुड्डी गाडी' म्हणून प्रसिद्ध असणारी गाडी बंद करण्यात आली. जाण्यायेण्याचा एकमेव आधार असलेली गाडी आमच्या प्रयत्नाने अनेकदा सुरू केली व महामंडळाने अनेकदा बंद ठेवली. काही काळ दुरुस्तीच्या नावाखाली बंद ठेवली व नंतर आमचा तगादा कायमचा बंद करण्यासाठी ही संपूर्ण गाडी लिलावात काढली. पुनर्वसन करताना संबंधितांची पूर्ण सहमती घेतल्याशिवाय गाव किंवा घर हटवू नये ही बाब जनमानसात रुजविण्यासाठी प्रयत्न केले. यातून 'तापी धरणग्रस्त' लोकांची बैठक मेधा पाटकर यांच्या अध्यक्षतेखाली घेतली व ती यशस्वी झाली. लोकांमध्ये जाणीव जागृती करताना त्यांना संघर्षशील करण्यासाठी 'खोज'च्या माध्यमातून मेळघाट ते अमरावतीपर्यंत अनेक मोर्चे, पदयात्रा व आंदोलने केली. लोकांना स्वत:च्या हक्कासाठी लढणे शिकवले. जमीन, अधिकार, शिक्षण याबरोबरच त्यांच्या हस्तकलांना वाव मिळावा म्हणून 'बांबू हस्तकला प्रशिक्षण' दिले.

घेतलेला निर्णय सोडून जाणे स्वभावात नव्हते. जिवलग मित्रांची साथ होती म्हणून आजपर्यंत मेळघाटात कार्यरत आहे. हे यश माझे एकट्याचे नसून सर्व 'खोज'च्या टीमचे आहे.

(शब्दांकन)

**बबन इंगोले**
अमरावती.
मोबा. ९८२३८०२२१७.